ठाणे, मंगळवार दि. १३ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १०६ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**पक्षफोडीच्या स्पर्धेची चर्चा**

सध्या कुठला पक्ष कोणासोबत जात आहे, तेच समजत नाही. पक्ष फोडणारे, आपण पक्ष फोडला हे थोडेच मान्य करणार आहेत? पूर्वी आणि आत्ताही देशात काही झाले तर शरद पवारांचे नाव घेतले जायचे.

......पान २ वर



असे रस शोषककीडी व गुलाबी बोंड अळीचे करा व्यवस्थापन

...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



काय हो जनाभाऊ,या खड्डयांच्या मागे अनेक अदृश्य शक्ती असल्याचा भास मला नेहमीच होतो !

# दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं (MSBSHSE) मोठी घोषणा केली आहे. दहावी आणि बारावीच्या (HSC SSC Exam Dates) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या काळात होणार आहे. तर, दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या काळात होणार, अशी माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे प्रसिद्धीपत्रक जारी करुन माहिती देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीनं पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई,कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत दहावी आणि बारावीच्या परीक्षा घेतल्या जातात. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (पान २ वर)

**बोर्डाकडून २०२५ च्या परीक्षेच्या आयोजनात मोठा बदल**



**दहावी बारावीच्या परीक्षांच्या तारखा :**

- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा (सर्वसाधारण व व्दिलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम : मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी, २०२५ ते मंगळवार, दि. १८ मार्च २०२५
- प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन : शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ ते सोमवार, १० फेब्रुवारी २०२५
- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा : शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी, २०२५ ते सोमवार दि. १७ मार्च, २०२५
- प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन : सोमवार, ०३ फेब्रुवारी २०२५ ते गुरूवार, २० फेब्रुवारी २०२५

**सविस्तर वेळापत्रक नंतर जाहीर होणार**

शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांसह विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याच्या दृष्टीने फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या नियोजित तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा व लेखी परीक्षांचे सविस्तर विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल, अशी माहिती देण्यात आली आहे. मंडळानं दहावी आणि बारावी परीक्षांच्या तारखांबाबत काही सूचना, हरकती असल्यास त्या २३ ऑगस्ट पर्यंत कळवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

## मराठा-ओबीसी आरक्षण सोडवण्यासाठी

# शरद पवार अखेर मैदानात

**पुणे: राज्यात गेल्या काही महिन्यांपासून धुमसत असलेल्या मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा तिढा सोडवण्यासाठी महाराष्ट्रातील सर्वात बुजुर्ग आणि जाणते नेते म्हणून ख्याती असलेल्या शरद पवार यांनी पहिले ठोस पाऊल टाकले. शरद पवार यांनी मराठा आणि ओबीसी आरक्षणावरुन निर्माण झालेला तिढा सोडवण्यासाठी राज्यातील सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन काम करण्याचे आवाहन केले. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वपक्षीय बैठक बोलवावी. या बैठकीला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी नेत्यांना बोलवावे, असा सल्ला शरद पवार यांनी दिला. ते सोमवारी पुण्यातील पत्रकारपरिषदेत बोलत होते.**



यावेळी शरद पवार यांनी आपली मराठा आणि ओबीसी आरक्षणाबाबतची भूमिका तपशीलवार मांडली. त्यांनी म्हटले की, माझ्या मते आज महाराष्ट्राचं सामाजिक वातावरण व्यवस्थित ठेवण्याची काळजी सगळ्यांनी घेतली पाहिजे. दोन समाजामध्ये कटुता निर्माण होणार नाही, यादृष्टीने पावलं टाकली पाहिजे. आज वेळीच काळजी घेतली नाही तर काय राहील, हे सांगता येणार नाही. मी पर्याय सुचवला की,माझी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी याबाबत चर्चा झाली. आता तुमच्यामार्फत असं सुचवू इच्छितो, मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलवावी. त्यांनी योग्य वाटतील त्या लोकांना बोलवावे. आम्ही विरोधी पक्ष म्हणून बैठकीला हजर राहू, आमची भूमिका सहकार्याची राहील, असे त्यांना सुचवले आहे. मुख्यमंत्री याबाबतची बैठक बोलवतील, त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या पक्षांच्या प्रमुखांना

**■ मनोज जरांगेंना सर्वपक्षीय बैठकीला बोलावण्याचा सल्ला**

बोलवावे. त्याशिवाय, हा प्रश्न मांडण्याच्याबाबत प्रकर्षाने ज्यांनी कष्ट घेतले त्या मनोज जरांगे पाटील यांनाही बैठकीला निमंत्रित करावे. दुसरा मुद्दा म्हणजे ओबीसी आरक्षणाचा, त्यांचे नेतृत्व करणारे जे कोणी घटक असतील, त्यांनाही बैठकीला निमंत्रित करावं. त्या संयुक्त बैठकीत आपण चर्चा करुन यामधून मार्ग काढण्याची भूमिका घ्यावी.

यामध्ये एकच अडचण येण्याची शक्यता आहे की, आज ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देता येत नाही, असा निर्णय न्यायव्यवस्थेने घेतला आहे. या निर्णयाची अडचण आली तर महाराष्ट्रातील सगळ्यांनी मिळून केंद्र सरकारमध्ये आग्रहाची भूमिका मांडावी. तामिळनाडूमध्ये यापूर्वी ७६ टक्क्यांपर्यंत आरक्षण दिले होते, तो निर्णय न्यायालयात टिकला होता. यानंतर ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देऊ नये,असेच निकाल देण्यात आले होते. त्यासाठी हे धोरण (पान २ वर)

## मनोज जरांगे निवडणूक लढवण्याचा निर्णय २९ ऑगस्टला जाहीर करणार!

**राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील यांच्या अनेकदा आरक्षणाच्या मुद्द्यावरून संघर्ष झाल्याचे दिसून येत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण दिले नाही तर विधानसभा निवडणुकीत २८८ उमेदवार उभे करण्याचा इशारा मनोज जरांगे यांनी दिला होता. यावरून छगन भुजबळ यांनी तुम्ही २८८ उमेदवार निवडणुकीत उभेच करा आणि ८ जागा निवडून आणून दाखवा, असे आव्हान मनोज जरांगेंना दिले होते. आता मनोज जरांगे छगन भुजबळ यांचे आव्हान स्वीकारण्याची चिन्ह दिसून येत आहेत. मनोज जरांगे निवडणूक लढवण्याचा निर्णय २९ ऑगस्टला जाहीर करणार आहेत.**

**भुजबळांचं आव्हान स्वीकारण्याची चिन्हं!**



अहमदनगरला रवाना होण्यापूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, मला आराम करायला लावला आहे. पण, मी उपचार घेऊन माझा दौरा पूर्ण करणार आहे. छगन भुजबळ आणि अनिल बोंडे यांना महत्त्व देत नाही. राज्यात आम्ही २८८ विधानसभा जागा लढवणार आहोत. सर्व राखीव जागांवर मराठा उमेदवार निवडून आणणार आहोत. इतर जागेवर इतर जातीतील उमेदवार निवडून आणणार आहोत. २९ ऑगस्टला निवडणूक लढणार की नाही याबाबत निर्णय घेणार, असे त्यांनी यावेळी म्हटले. आता मनोज जरांगे पाटील छगन भुजबळ यांचे आव्हान स्वीकारणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**नेमकं काय म्हणाले होते छगन भुजबळ?**

छगन भुजबळ म्हणाले की, मराठा समजाला ओबीसीमधून आरक्षण दिले नाही तर आम्ही २८८ उमेदवार उभे करणार आहोत, असे मनोज जरांगे पाटील म्हणतात. तुम्ही आधी ८८ उमेदवार तर उभे करा आणि त्या उमेदवारामधून फक्त ८ उमेदवारच निवडून आणून दाखवा. निवडणुकीच्या मैदानात या आणि निवडणुका लढवा. माझे तुम्हाला आव्हान आहे की, तुम्ही विधानसभा निवडणुकीत २८८ उमेदवार उभेच करुन दाखवा, असे त्यांनी म्हटले होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार भारतीय जनता पार्टीतर्फे ठाण्यात 'हर घर तिरंगा' अभियान मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येत आहे. त्यानुसार भाजपच्या विभागीय कार्यालयासह खोपट कार्यालय व शहरातील घरे, दुकाने व खाजगी आस्थापना यांच्यावर लावण्यासाठी भाजपतर्फे ५ हजार तिरंगा ध्वज वाटप करण्यात आले. (छाया - मनोज सिंह)

# डायघरवासियांचा कचरा प्रश्न लवकरच मार्गी लागणार...

**ठाणे -कल्याण तालुक्यातील डायघर येथील भागात नागरिकांना कचऱ्याच्या समस्येने ग्रासले आहे. याविषयी त्यांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचे हत्यारही उपसले होते. मात्र संवेदनशील जिल्हाधिकारी म्हणून ओळख असलेले जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी त्यांच्या या प्रश्नांबाबत चर्चेतून प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार प्रमोद (राजू) पाटील यांच्यासह तेथील नागरिकांना आज जिल्हाधिकारी कार्यालयात आमंत्रित केले होते.**




**जिल्हाधिकाऱ्यांचा नागरिकांना दिलासा...**

ठाणे -कल्याण तालुक्यातील डायघर येथील भागात नागरिकांना कचऱ्याच्या समस्येने ग्रासले आहे. याविषयी त्यांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचे हत्यारही उपसले होते. मात्र संवेदनशील जिल्हाधिकारी म्हणून ओळख असलेले जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी त्यांच्या या प्रश्नांबाबत चर्चेतून प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार प्रमोद (राजू) पाटील यांच्यासह तेथील नागरिकांना आज जिल्हाधिकारी कार्यालयात आमंत्रित केले होते. (पान २ वर)

**थोडक्यात घडामोडी**

**होमगार्ड मध्ये सेवा करु इच्छिणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करावेत**

ठाणे - ठाणे जिल्हा होमगार्ड मधील ७०० होमगार्ड अनुशेष भरण्याकरिता होमगार्ड नोंदणीचे आयोजन केले आहे. याकरिता दि. २५ ऑगस्ट २०२४ अखेर ऑनलाईन अर्ज मार्गाविण्यात येत असून होमगार्ड नोंदणीचे माहितीपत्रक नियम व अटी याबाबत विस्तृत माहिती https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी होमगार्ड मध्ये सेवा करु इच्छिणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील रहिवासी उमेदवारांनी नोंदणीकरिता अर्ज करावा, असे आवाहन ठाणे जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अपर पोलीस अधीक्षक डॉ. दिपाली धाटे यांनी केले आहे.

**मिरा भाईंदरचे कोर्ट याच वर्षात सुरु होणार!**

**आमदार प्रतापसरनाईक यांच्या सूचनेवर सरकारचे उत्तर** (सविस्तर वृत्त पान ४)

# 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजनेचा लाभ उपलब्धतेसाठी १४ व २० ऑगस्ट रोजी नमुंमपा मुख्यालयात विशेष शिबिर

नवी मुंबई - महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने दि. ९ जुलै २०२४ चा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३ नुसार नवी मुंबई महानगरपालिकेत ६ महिन्यांच्या कालावधीकरिता शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण देणे कामी ३० संवर्गातील एकूण १९४ पदांसाठी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून दिनांक २० ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबत सविस्तर जाहिरात, पदसंख्या व शैक्षणिक अर्हता शासनाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या अधिकृत पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याकरिता शिकाऊ उमेदवारांना शासनामार्फत दरमहा विद्यावेतन देण्यात येणार आहे. (पान २ वर)

# सी पी टँक येथील कचरा उचलण्यासाठी जादा मनुष्यबळ आणि गाड्या ठेवण्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश



ठाणे - सी पी टँक येथे साठलेला कचरा उचलून वागळे इस्टेट भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. त्यासाठी जादा मनुष्यबळ, जादा गाड्या यांचा वापर करून वेगाने हा कचरा उचलला जावा असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. सोमवारी सायंकाळी आयुक्त सौरभ राव यांनी सी पी टँकला भेट देऊन कामाची पाहणी केली.

त्याचवेळी, या कचरा हस्तांतरण केंद्रातील सगळा कचरा उचलला जाईपर्यंत या परिसरात दुर्गंधी पसरू नये, डासांची उत्पत्ती (पान २ वर)



■ ठाण्यातील लुईसवाडी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील टेस्ट ड्रायव्हिंग १२ कि.मी. लांब कासारवडवली आनंद नगर येथे हलवल्याने नागरीक त्रस्त झालेत. समाजसेवक संगम डोंगरे यांनी हा प्रश्न ऐरणीवर घेत प्रादेशिक परिवहन आधिकारी हेमांगिनी पाटील यांची भेट घेतली आहे. तसेच निवेदन देखील देण्यात आले आहे. पुर्वी ठाण्यातील लुईसवाडी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात टेस्ट ड्रायव्हिंग पार पडत होते. मात्र आता ही टेस्ट ड्रायव्हिंग कासारवडवली आनंद नगर येथे स्थलांतरित केल्याने नागरीकांना १२ कि.मी. लांबचा प्रवास करावा लागतोय. नविन ड्रायव्हर पेपर वर्क लुईसवाडी आर.टी.ओ येथे करणार आणि टेस्ट ड्रायव्हिंगसाठी लांबचा प्रवास करावा लागत असल्याने नागरीक त्रस्त झालेत. (छाया - मनोज सिंह)

# दिव्यांगांसाठी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा प्राधान्याने देणार, विविध क्षेत्रात दिव्यांगाना संधी देखील देणे अपेक्षित, शासन व पालिका प्रयत्नशील- आयुक्त

**भिवंडी – १ ते १५ ऑगस्ट दरम्यान राज्यात महसूल पंधरवाडा साजरा केला जात आहे.त्यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित होत असून भिवंडी शहरात या निमित्त दिव्यांगांसाठी 'एक हात मदतीचा दिव्यांगांच्या कल्याणाचा' या कार्यक्रमाचे आयोजन तहसीलदार अभिजित खोले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. याचे उद्घाटन पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या हस्ते झाले.**




भिवंडी महानगरपालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास पालिका उपायुक्त डॉ. अनुराधा बाबर, अप्पर तहसीलदार अभय गायकवाड,तालुका आरोग्य अधिकारी डॉ नलिनी ठोंबरे यांसह नायब तहसीलदार विशाल इंदुलकर, आदेश म्हात्रे, दत्तात्रय बांबळे, पालिका जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले, पालिका समाज कल्याण अधिकारी नितेश चौधरी, आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

पालिका आयुक्त आपल्या उद्घाटनपर भाषणात नमूद केले की दिव्यांग हे सुध्दा समाजाचे घटक असून त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी शासनाने , पालिकेने विविध योजनांच्या माध्यमातून लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे दिव्यांगाना आधाराची गरज असून त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी संधी देखील मिळाली पाहिजे असे देखील पालिका आयुक्त यांनी नमूद केले. महसूल विभागाने आपला पंधरवाडा साजरा करीत असताना या घटकाचा प्राधान्याने विचार केला असल्याचे प्रास्ताविकात तहसीलदार अभिजित खोले यांनी स्पष्ट केले. महसूल विभाग बारा महिने चोवीस तास कार्यरत असते.त्यांनी केलेले चांगले काम समाजापर्यंत पोहचविण्या साठी पंधरवाडा आयोजित केला जात असल्याने त्या निमित्त शुभेच्छा देत आयुक्त अजय वैद्य यांनी पालिकेने दिव्यांगांना मतदान प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी लोकसभा निवडणुकीत १७० व्हीलचेअर खरेदी केल्या आहेत.तर पालिकेत अंध नागरिकांना मदत होण्यासाठी मुख्यालयात सर्व विभागा बाहेर ब्रेल लिपीत नामफलक देखील लावण्यात आल्याची माहिती अजय वैद्य यांनी दिली. पालिका मुख्यालयात अपंगांकरिता मजल्यावर कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते (पान २ वर)

## दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर

**(पान १ वरून)** परीक्षा म्हणजेच बारावीची परीक्षा दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवडयात आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा म्हणजे दहावीची परीक्षा मार्चच्या पहिल्या आठवडयात आयोजित केली जाते.

विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया वेळेवर होणे, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा या मंडळाच्या परीक्षेनंतर आयोजित केल्या जात असल्याने अशा परीक्षांचा अभ्यास करण्यास विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळावा तसेच पुरवणी परीक्षा लवकर घेवून त्याचा निकाल लवकर जाहीर करणे, या बाबींचा विचार करुन सन २०२५ ची फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणारी दहावी आणि बारावीची परीक्षा नेहमीपेक्षा १८ ते १० दिवस आधी आयोजित करण्याचा मंडळाचा मानस असून त्याअनुषंगाने लेखी, प्रात्यक्षिक आणि इतर परीक्षा पुढील तारखांना घेण्याचे नियोजन असल्याचं मंडळाकडून सांगण्यात आलं आहे.

## शरद पवार अखेर मैदानात

**(पान १ वरून)** बदलायचे असेल आणि ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण द्यायचे असेल हा अधिकार केंद्र सरकारकडे आहे. महाराष्ट्रातील घटक याबाबत कुठल्याही प्रकारची राजकीय मतभेद न करता केंद्र सरकारने यामध्ये पुढाकार घेतल्यास आमचे पूर्ण सहकार्य असेल. या पद्धतीने आपण प्रयत्न करुन यामधून मार्ग काढू, असे शरद पवार यांनी सांगितले.

## डायघरवासियांचा कचरा प्रश्न लवकरच ...

**(पान १ वरून)** या बैठकीस ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, कल्याण तहसिलदार सचिन शेजाळ, नायब तहसिलदार दिनेश पैठणकर, डायघरवासिय उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रमोद (राजू) पाटील यांनी तेथील समस्यांचा पाढाच वाचला. बहुतांश समस्या या त्या परिसरात साचलेला कचरा, दुर्गंधी अन् त्यामुळे उद्भवणाऱ्या आरोग्य विषयक समस्या याबाबतीतील होत्या. यावर जिल्हाधिकारी श्री.शिनगारे यांनी ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना हे विषय अतिशय गांभीर्याने घेण्याचे सूचित केले. तसेच या परिसरातील कचरा तात्काळ हटवावा, त्या कचऱ्यावर आवश्यक ती प्रक्रिया करावी, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने कराव्यात, अशाही सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

याशिवाय येथील नागरिकांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश मुर्त्यांच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावाचीही मागणी केली. ही मागणी तात्काळ मान्य करीत ठाणे मनपाचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी तेथे कृत्रिम तलावाची लगेचच उभारणी करण्यात येईल, असे आश्वासित केले.

शेवटी जिल्हाधिकारी महोदयांनी डायघरवासियांसाठी तातडीने घेतलेल्या या बैठकीबद्दल आमदार प्रमोद (राजू) पाटील यांच्यासह उपस्थित सर्व नागरिकांनी आभार मानले.

## सी पी टँक येथील कचरा उचलण्यासाठी जादा मनुष्यबळ आणि गाड्या ठेवण्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

**(पान १ वरून)** होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणावर औषधांची फवारणी करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळेल, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. वागळे इस्टेट येथील सी पी टँक येथील साठलेला कचरा उचलण्याचे काम सुरू आहे. या कामाची पाहणी करताना उपायुक्त मनीष जोशी, उपायुक्त शंकर पाटोळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. राणी शिंदे आदी उपस्थित होते. कचरा उचलण्याची गती आणि त्याची वाहतूक याविषयी डॉ. शिंदे यांनी माहिती दिली. स्थानिक नागरिकांनीही यावेळी आयुक्त राव यांची भेट घेवून कचरा उचलण्यास सुरुवात झाली असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## दिव्यांगांसाठी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा प्राधान्याने देणार, विविध क्षेत्रात दिव्यांगाना संधी देखील देणे अपेक्षित, शासन व पालिका प्रयत्नशील– पालिका आयुक्त

**(पान १ वरून)** शासनाच्या विविध योजनाचे लाभार्थी असलेली दिव्यांगांना प्रमाणपत्र देण्यात आले.तर दिव्यांगांच्या वर्गासाठी काम पाहणाऱ्या सेवाभावी संस्थांच्या पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम ठिकाणी दिव्यांगांना शासकीय योजनांची माहिती देणारे स्टॉल उभ्यारण्यात आले होते. तर दिव्यांगांची आरोग्य तपासणी पंचायत समितीच्या आरोग्य पथकाने केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महसूल विभागातील मंडळ अधिकारी तलाठी यांनी विशेष मेहनत घेतली.

## 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजनेचा लाभ उपलब्धतेसाठी १४ व २० ऑगस्ट रोजी नमुंमपा मुख्यालयात विशेष शिबिर

**(पान १ वरून)** यामध्ये १२ वी पास उमेदवारांना रु.६,०००/-, आय.टी.आय./पदविका धारक उमेदवारांना रु.८,०००/- आणि पदवीधर/पदव्युत्तर उमेदवारांना रु.१०,०००/- विद्यावेतन दिले जाणार आहे. याद्वारे पात्र उमेदवारांना कळविण्यात येते की, दि.१४.०८.२०२४ व दि.२०.०८.२०२४ रोजी सकाळी १०:०० वाजता नवी मुंब मुख्यालय, भूखंड क्र.१, सेक्टर १५ ए, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी शिबिराचे आयोजन करण्यात येत आह यानुसार, संबंधितांनी आपले संपूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी/दूरध्वनी क्रमांक, मेल-आयडी/शैक्षणिक अर्हता, जन्मतारीख, बँक तपशील इ. कागदपत्रांसह १४ व २० ऑगस्ट रोजी सदरील ठिकाणी उपस्थित रहावे. प्रथम येणाऱ्या उमेदवाराला प्रथम प्राधान्य देण्यात येईल याची नोंद घेण्यात येईल. सदर नियुक्तीच्या अनुषंगाने शासनाकडील दि.०९.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयामधील सर्व अटी व शर्ती उमेदवारावर बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी असे सूचित करण्यात आले आहे. तरी पात्र युवकांनी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'चा लाभ घेण्यासाठी दिनांक १४ व २० ऑगस्ट २०२४ रोजी महापालिका मुख्यालयात आयोजित शिबिरास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## पक्षफोडीच्या स्पर्धेची चर्चा

सध्या कुठला पक्ष कोणासोबत जात आहे, तेच समजत नाही. पक्ष फोडणारे, आपण पक्ष फोडला हे थोडेच मान्य करणार आहेत? पूर्वी आणि आत्ताही देशात काही झाले तर शरद पवारांचे नाव घेतले जायचे. पण ते आरोप खरे असायचेच असे नाही. सध्याही राजकारणात विविध आरोप – प्रत्यारोप होत असतात. आता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसला टोला दिला आहे की, देशात जर पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर त्याचे सुवर्णपदक शरद पवार यांना मिळेल, अशी खोचक टीकाच फडणवीसांनी केली आहे. तसेच राज्यात महाविकास आघाडीबाबत कुठेही सहानुभूती नसून काही लोकांद्वारे केवळ सहानुभूतीचा डंका वाजवला जातो आहे, असे ते म्हणाले. म्हणजे ज्यांनी महाराष्ट्रातील दोन प्रादेशिक पक्ष फोडले, त्यांनीच शरद पवारांवर पक्षफोडीची आरोप केले आहेत. बरे भाजपाने ते दोन पक्ष फोडले नाहीत असे समजले तरी त्यांना बिनशर्त पाठींबा देत राज्यात सरकार स्थापनही केले आहे. आता उगीच चर्चा कशाला करायची ? परंतु राज्यातील सत्ताधारी नेत्यांना टाईमपास करण्याची सवाल लागली आहे असे दिसते. देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फुटण्याबाबतही विचारण्यात आले. यासंदर्भात बोलताना त्यांनी शरद पवार यांच्यावर खोचक टीका केली. भाजपाने किंवा आपण कोणताही पक्ष फोडला नाही, याचे समर्थन करताना देवेंद्र फणविस यांनी म्हटले आहे की, मी पुन्हा आलो, पण यावेळी दोन पक्ष फोडून आलो, असे मी एकदाच बोललो होतो. आणि तेही गंमतीने बोललो होतो. खरे तर अशाप्रकारे कोणीही कोणाचे पक्ष फोडू शकत नाही. दोन्ही पक्ष त्या त्या पक्षांतील नेत्यांमुळे फुटले. एकनाथ शिंदे यांना शिवसेनेत आणि अजित पवार यांना राष्ट्रवादीत त्यांचे भविष्य दिसत नसल्याने ते पक्षातून बाहेर पडले, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. देवेंद्र फडणवीस वकील असल्यामुळे ते खरे वाटावे असे बोलण्यात पटाईत आहेत. आपला मुद्दा चुकीचा असो वा बरोबर तो योग्यच आहे, असा युक्तिवाद खूप कमी जणांना करता येतो. फडणवीस त्यापैकीच एक असावेत. हे बोलताना फडणवीस यांनी शरद पवारांनाही या वादात ओढून घेतले आहे. पुढे बोलताना त्यांनी शरद पवार यांनाही लक्ष्य केले. मुळात शरद पवार यांनी आतापर्यंत सगळ्यात जास्त पक्ष फोडले. पक्ष फोडण्याचा विक्रम त्यांच्याच नावावर आहे. देशामध्ये पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर शरद पवार यांना सुवर्णपदक मिळेल, असा टोला त्यांनी लगावला. फडणवीसांनी पुढे बोलताना म्हटले आहे की, लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्याबद्दल लोकांमध्ये सहानुभूती होती, असे वाटत नाही. फक्त माध्यमांतील काही लोकांनाच त्यांच्याबद्दल राज्यात सहानुभूती असल्याचे वाटते. तेच लोक सतत सहानुभूतीचा डंका वाजतवत असतात, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. तसेच राज्यात त्यांच्याबद्दल सहानुभूती असती, तर बीडची जागा त्यांनी फक्त ६ हजार मतांनी जिंकली नसती. ती जागा त्यांनी मतांचे ध्रुवीकरण करून जिंकली, असेही ते म्हणाले. महाराष्ट्र विकास आघाडीला काही लोकच मानतात, हे शब्द फडणवीस खरे बोलले. परंतु राज्यातील दोन प्रादेशिक पक्ष का फुटले याची चर्चा करताना भाजपाचेही नाव येते हे खरे आहे. लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांनी अतिशय अनुभवाने आपल्या जागा निवडल्या आणि त्याचे श्रेय त्यांना द्यावेच लागेल. कुठे सरकारविरोधात वातावरण आहे, त्याचा अभ्यास करूनच त्यांनी जागा लढवल्या. विधानसभा निवडणुकीतही ते कमी आणि मोजक्याच जागा लढवतील, असे वाटते, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय अभ्यास चांगला आहे. परंतु गत लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या इशाऱ्यावर निवडणूक आयोगाने शरद पवार यांच्या गटाच्या निवडणूक चिन्हाशी साधर्म्य असलेले चिन्ह काही अपक्षांना देऊन भाजपाच्या उमेदवाराला राजकीय लाभ कसा होईल ते पाहिले. ही चूक निवडणूक आयोगावर ढकलून भाजपा नेते निवांत बसले आहेत. सत्ताधारी पक्षाची ही खेळी योग्य आहे काय ? तसेच शिवसेना पक्ष फुटला तेव्हा बंडखोर गटाला कुणी प्रोत्साहन किंवा मदत केली होती ? या प्रश्नांची उत्तरे शोधली तरी वास्तव समजते. असो. राजकारणात सर्व काही माफ असते म्हणतात ते उगीच नाही. लोकप्रतिनिधींनी विनाकारण चर्चा करून जनतेचे लक्ष वेधू नये असे वाटते, ती जनतेची एक प्रकारे फसवणूक आहे, असे वाटते.

---

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक आरोग्य विभाग

निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १५ वा वित्तआयोगांतर्गत ४८ सफाई कर्मचारी पदे बाहयस्त्रोत यंत्रणेव्दारे भरण्याकरीता ऑनलाईन द्विवार्षिक निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि.१२/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४ पर्यंत संध्याकाळी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि.२१/०८/२०२४ रोजी संध्याकाळी १६.०० वाजेपर्यंत ऑनलाईन निविदा स्विकारण्यात येतील. दि. २३/०८/२०२४ रोजी संध्याकाळी १६.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार ठाणे महापालिकेने राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/२७४/२०२४-२५ सही/-
दि:१२.०८.२०२४ वैद्यकीय आरोग्य अधिकारी
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

---

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**निविदा सुचना**

सार्व. बांधकाम विभाग या विभागातर्फे वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत "रस्ते दुरुस्ती" या लेखाशिर्षका अंतर्गत विविध रस्त्यांची दुरुस्ती दुरुस्ती करणे (सन २०२४-२५) या कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेच संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि.१४/०८/२०२४ ते २१/०८/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळावर दि.२१/०८/२०२४ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि.२३/०८/२०२४ रोजी १६.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-व.प्र.स/२७५/२०२४-२५ सही/-
दि:१२.०८.२०२४ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

---

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

आरोग्य विभाग अंतर्गत जन्म-मृत्यु विभाग

**पहिली मुदतवाढ**

ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग अंतर्गत जन्म-मृत्यु विभागाकडील लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र.१५ (क) जयभवानीनगर स्मशानभुमी मध्ये स्वच्छ हवा कृती आराखडा योजना व एकात्मिक स्मशानभुमी नुतनीकरण कार्यक्रमाअंतर्गत २ PNG शवदाहिनी व १० पारंपारिक शवदाहिनीचे ५ वर्ष कालावधीकरीता निगा, देखभाल व परिचलन करणेकरीता ऑनलाईन ई-टेंडरींग पध्दतीने ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in निविदा मागविण्यात आली होती. निविदा सूचना कालावधीत सदरकामी अल्प प्रतिसाद प्राप्त झालेला असल्याने सदरकामी दि. १२/०८/२०२४ ते दि. १९/०८/२०२४ रोजी ४.०० वाजेपर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहेत. प्राप्त निविदा दि. २०/०८/२०२४ रोजी ११.०० वाजता उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/२७३/२०२४-२५ सही/-
दि:१२.०८.२०२४ उपआयुक्त (आरोग्य)
**Pls visit our oficial web-site** ठाणेमहानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

---

### जाहिर नोटीस

तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण ठाणे, यांचे न्यायालयांत **मौजे निघू, तालुका व जिल्हा ठाणे,** येथील खालील वर्णन केलेल्या जमीनीबाबत महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन कायदा १९४८ चे कलम **३२(ग) अन्वये जमीनीची विक्री करुन मिळणेबाबत** दावा दाखल केला आहे.

**जमीनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स. नं. | हि. नं. | क्षेत्र | आकार | अर्जदार व सामनेवाले यांची नांवे |
|---|---|---|---|---|---|
| मौजे निघू तालुका व जिल्हा ठाणे | ४६ | २ | ०-३२-१० | २-६२ | श्री. दत्तु महादु पाटील. रा. मौजे निघू, ता. जि. ठाणे. विरुध्द १. श्री. वनमाळीदास गंगादास ठाणावाला. २. श्री. पुरुषोत्तमदास गंगादास ठाणावाला. क्रं. १ व २, रा. मौजे निघू, ता. जि. ठाणे. ३. श्रीमती. अंबीबाई बापु पाटील. ४. श्रीमती. पार्वतीबाई काळुराम मढवी. ५. श्रीमती. बेबीबाई बळीराम आंबेकर. ६. श्री. सुखदेव रतन पाटील. ७. श्री. अजय सुखदेव पाटील. ८. श्रीमती. ज्योती सुखदेव पाटील. ९. श्री. पंडीत सुखदेव पाटील. १०. श्री. वाल्मिक शांताराम पावशे. ११. श्रीमती. सपना सुजित नाईक. १२. श्रीमती. सुगंधा प्रकाश नाईक. १३. श्रीमती. सुरेखा दिपक पाटील. १४. श्रीमती सरिता बाबु गवळी. १५. श्रीमती. संध्या भिकून पंडीत. क्रं. ३ ते १५, रा. मौजे निघू, ता. जि. ठाणे. |

वरील दाव्यातील प्रकरणी **सामनेवाले क्रं. १) श्री. वनमाळीदास गंगादास ठाणावाला व इतर १, क्रं. १ व २, रा. मौजे निघू, ता. जि. ठाणे** यांना वरील पत्यावर नोटीस पाठविण्यांत आलेलो आहे. परंतु सामनेवाले हे तारखांना उपस्थित न झाल्याने ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सामनेवाले अथवा त्यांचे कायदेशीर वारस अथवा अन्य कोणी हितसंबधीत इसमांनी सदर दाव्याकामी **दि. १६/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसीलदार ठाणे** यांचे दालनात होणाऱ्या सुनावणीच्या दिवशी स्वतः त्यांचे कायदेशीर सल्लागार यांनी दावा जमीनीबाबत सर्व संबंधित कागदोपत्री पुराव्यासह उपस्थित रहावे. सदर दिवशी सामनेवाले पक्षकारांनी हितसंबंध दर्शविला नाही. तर त्यांना या दाव्याकामी स्वारस्य नाही. तसेच दाव्यामध्ये काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून एकतर्फी सुनावणी घेवून नियमानुसार योग्य ती निर्णय देण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

क्रमांक/कुळवहिवाट/३२ (ग)/निघू/१३/२०२४
तहसीलदार कार्यालय, ठाणे.
दिनांक :- ०८/०८/२०२४ (शिक्का)

सही/-
(उमेश पाटील)
तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, ठाणे

---

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**

ई मेल पत्ता :- thane2.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- ०२२-२५३६१३९३

### ई निविदा सुचना क्रमांक २३ सन २०२४– २५

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र. २, ठाणे जिल्हा ठाणे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गातील **फक्त ठाणे जिल्ह्यातील नोंदणीकृत मजुर सहकारी सोसायटीकडून** खालील कामांकरिता **ब–१** नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध आहेत. (वरीलपैकी काही अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र. २, ठाणे यांनी रोखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.)

कामाचे नांव :- १) शहापुर तालुक्यातील अस्नोली बाभळे ग्रामा– ४५२ रस्त्यालगत संरक्षण भिंत बांधणे. (आदिवासी विभाग विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु. ९,९२,७४९/–**

२) शहापुर तालुक्यातील निपुर्तेपाडा जोडरस्त्यावर संरक्षण भिंत बांधणे. (आदिवासी विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.१२,४१,७७६/–**

३) शहापुर तालुक्यातील चोंढे ते बनाचीवाडी रस्ता तयार करणे. ग्रामा– ३३८ ( आदिवासी विभाग विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.१६,६१,३४२/–**

४) शहापुर तालुक्यातील ग्रामपंचायत वेहळोली अंतर्गत मोंडळवाडी येथे भाऊ मोंडुळा यांच्या घराकडे जाणारा रस्ता तयार करणे. (आदिवासी विभाग विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु. १६,२७,१५८/–**

५) शहापुर तालुक्यातील खुटघर अंदाड जोड रस्त्यावर साकाव बांधणे. (डीपीडीसी साकव कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.१६,३८,१२३/–**

६) शहापूर तालुक्यातील काजळविहीर जोडरस्ता सुधारणा करणे. (आदिवासी विभाग विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.१६,५८,३७०/–**

७) शहापूर तालुक्यातील पाषाणे जोडरस्ता सुधारणा करणे. (आदिवासी विभाग विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.१६,५८,८४२/–**

८) शहापूर तालुक्यातील कामतवाडी रस्त्यावर साकव बांधणे. (डीपीडीसी साकव कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु. १६,५८,३९४/–**

९) शहापुर तालुक्यातील फणसवाडी ढाढरे जोडरस्ता तयार करणे. (आदिवासी विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.१६,६२,३७७/–**

१०) शहापुर तालुक्यातील राममा क्र.५० ते वेहळोली बु. ( कातकरवाडी) रस्ता सुधारणा करणे. (आदिवासी विभाग विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.२०,४२,७०९/–**

११) शहापूर तालुक्यातील ५४८–अ मार्ग ते शिरगांव येथे जोडरस्त्यावर साकव बांधणे. (डीपीडीसी साकव कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.२०,५८,६८७/–**

१२) शहापुर तालुक्यातील बेलपाडा साखरपाडा रस्त्यावर साकव बांधणे. (डीपीडीसी साकव कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.२०,५८,८६१/–**

१३) शहापुर तालुक्यातील मौजे ग्रा.मा. रानविहीर ते मधलीवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर साकव बांधणे. (डीपीडीसी साकव कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.२०,६०,३१३/–**

१४) शहापुर तालुक्यातील पोकल्याचीवाडी गांव तलावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर साकाव बांधणे. (डीपीडीसी साकव कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु. २०,७१,९९०/–**

१५) शहापुर तालुक्यातील मौजे साकडबाव रस्त्यावर साकाव बांधणे. (डीपीडीसी साकव कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.२०,७१,९९०/–**

१६) शहापुर तालुक्यातील प्रजिमा– ९५ पासुन खरीड गांवदेवीचा रस्ता तयार करणे. (५०५४ मार्ग व पुल ०४), **अंदाजित किंमत :– रु.२४,७७,५४१/–**

१७) शहापुर तालुक्यातील अस्नोली ते किन्हवली रस्ता सुधारणा करणे. (आदिवासी विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.२०,८५,०१४/–**

१८) शहापुर तालुक्यातील ढाढरे जोडरस्ता तयार करणे. (आदिवासी विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.२२,३०,९७८/–**

१९) शहापूर तालुक्यातील ढाकणे कातकरीवाडी जोडरस्ता तयार करणे. (आदिवासी विभाग विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.२४,९४,५८६/–**

२०) शहापूर तालुक्यातील ढाकणे पिंपळवाडी जोडरस्ता तयार करणे. (आदिवासी विभाग विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.२४,९१,१३६/–**

२१) शहापुर तालुक्यातील चिखलगांव कातकरीवाडी जोडरस्ता तयार करणे. ग्रामा– ४७७ (आदिवासी विभाग विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु. २४,७५,८३७/–**

२२) शहापुर तालुक्यातील प्रजिमा– ६३ कि.मी. ११/८०० ते १२/२०० रस्त्यालगत संरक्षण भिंत बांधणे. (५०५४ मार्ग व पुल ०४), **अंदाजित किंमत :– रु. २४,८७,७८४/–**

२३) शहापुर तालुक्यातील आटगाव येथे किरण घोडविंदे यांच्या घराकडे जाणारा रस्ता तयार करणे. (आदिवासी विभाग विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :– रु.२५,०३,८६६/–**

ई–निविदा उपलब्ध कालावधी :- **दि. १३/०८/२०२४ ते दि. २०/०८/२०२४**
ई–निविदा उघडणे :- **दि. २३/०८/२०२४**

खालील संकेतस्थळांवर ई–निविदांची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळांवर कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र. २, ठाणे कार्यालयातील सूचना फलक
४) ई निविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर निविदांबाबत निविदेमध्ये नमुद कागदपत्रांच्या हार्ड कॉपी १ (एक) प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सुचनेनुसार नमुद वेळेपूर्वी सादर करणे अनिवार्य राहिल.

**सही/–**
कार्यकारी अभियंता
सा. बां. विभाग क्र. २, ठाणे

जा.क्र. साबांविक्र. २/ठाणे/ई–निविदा/२०२४–२५ / ७५२३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग क्र. २ ठाणे,
सा. बां. आवार, स्टेशन रोड, ठाणे – ४००६०१.
दिनांक :- ०७/०८/२०२४

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे,
वेस्ट व्ह्यू बिल्डींग, तिसरा मजला
राम मारुती रोड,
ठाणे (प), पिन ४००६०१.

### चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक :- DYCC / ८६०/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :- रोटरी सेवा ट्रस्ट कल्याण
ई- १२४३९/ ठाणे, दि. २०/१०/२०२१

अर्जदार :- श्री. दिलीप श्रीरंग घाडगे

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उपायुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.

१) श्री. मधुसूदन जवेरचंद देवकर २) श्री. प्रशांत शिवनारायण तोश्निवाल
३) श्री. अमित विनायक वझे ४) श्रीमती. शिला रघुनंदन सबनीस
५) श्री. किर्तीकुमार मोहलाल रायचुरा

तसेच खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये / विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आल आहे.

१) श्री. दिलीप श्रीरंग घाडगे २) श्री. नामदेव बाबु चौधरी
३) श्री. नितिन शिवराम माचकर ४) श्रीमती. शिला रघुनंदन सबनीस
५) श्री. किर्तीकुमार मोहलाल रायचुरा ६) श्री. केदार श्रीकांत पोंक्षे
७) डॉ. सई सुश्रुत वैद्य

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ९/०८/२०२४ रोजी दिली.

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे.

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे,
वेस्ट व्ह्यू बिल्डींग, तिसरा मजला
राम मारुती रोड,
ठाणे (प), पिन ४००६०१.

### चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांकः ध उ आ / ८४९ / २०२४ (MA-१६८/२४)
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांकः दि टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ
न्यास नोंदणी क्र. एफ/६६ / ठाणे

अर्जदारः श्री. राजेंद्र विष्णू कामतेकर

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उपायुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत.

अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे की, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून कमी करण्यात आले आहे.

१) डॉ. संदीप घरत २) श्री. श्रीकांत अ पावगी
३) श्री. आशीर्वाद म बोंद्रे ४) श्री. राजेंद्र वि कामतेकर
५). श्री. संदीप म वैद्य ६) श्रीमती. नितेश्री नि काबाडी
७) श्री. सतीश वा मेढी (८) श्रीमती. अर्चना ह जोशी
९) श्रीमती. मीनल म बोकील

तसेच, खालील नमूद विश्वस्तांचा विश्वस्त म्हणून कार्यकारी मंडळात समावेश करण्यात आला आहे.

१) श्री. आशीर्वाद म बोंद्रे २) श्रीमती अर्चना ह जोशी
३) श्रीमती. नितेश्री नि काबाडी ४) श्रीमती. रुपाली साखरे
५) श्री. राजेंद्र वि कामतेकर ६) श्री. सतीश वा मेढी
७) श्रीमती. मीनल म बोकील ८) श्री. विनय ग. भोळे
९) श्री. महेश नाईक १०) श्रीमती कोमल साखळकर
११) श्री. आनंद अंबरडेकर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यायची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपायुक्त, ठाणे विभाग, ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १२/०८/२०२४ रोजी दिली.

सही/-
अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे

---

### जाहीर नोटीस

याव्दारे जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्री. लालबहादूर तिवारी, पत्ता- जय भवानी चाळ, रूम नं. १०४१, भास्कर नगर, कळवा, ठाणे यांनी त्यांचे मुलगी कु. सुष्टी लालबहादुर तिवारी यांच्या जन्माची नोंद ठाणे महानगरपालिका यांचे अभिलेखात केली नसल्याने कु. सृष्टी लालबहादुर तिवारी यांचे जन्माची नोंद करणेकामी ठाणे महानगरपालिका यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि.११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करुन जन्म मृत्यूच्या तारखेपासून १ वर्षानंरतच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ कलम २३(२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले आहेत. तरी प्रकरणी कु. सुष्टी लालबहादुर तिवारी यांचे जन्माची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारीत करणेकामी कोणाचे आक्षेप/हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वतः अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यासह न चुकता हजर रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

क्र. महसूल/कक्ष-१/ह.नोंद-१/टे-३/कावि-४७२६/२०२४
तहसीलदार कार्यालय, ठाणे
दिनांक:- ११/०६/२०२४

(शिक्का)

सही/-
दिनेश पैठणकर
निवासी नायब तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !



संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे



## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार – २ नायब सुभेदार –
■ क्रीडा पात्रता: ऍथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## मध्य रेल्वे

■ जागा : २४२४
■ पदाचे नाव: अप्रेंटिस
मुंबई
भुसावळ
पुणे
नागपूर
सोलापूर
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये NCVT (Fitter/Welder / Carpenter/ Painter/Tailor/Electrician/ Mechanist / PASAA / Mechanical Diesel / Lab Assistant/Turner/ Electronics Mechanic/Sheet Metal Worker / Winder / MMTM/Tool Die Maker/Mechanical Motor Vehicle/IT Electronic System Maintenance)
■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: मध्य रेल्वे
■ Fee: General/OBC: 100/- SC/ ST/PWD/EWS/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://cr.indianrailways.gov.in/

## पश्चिम–मध्य रेल्वे

■ जागा : ३३१७ जागा
■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
■ शैक्षणिक पात्रता: मेडिकल लॅब टेक्निशियन: (i) १२वी उत्तीर्ण (Physics, Chemistry Biology) (ii) NCVT/SCVT. उर्वरित ट्रेड: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: ०५ ऑगस्ट २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: पश्चिम–मध्य रेल्वे
■ Fee: General/ OBC:141/- SC/ST/ PWD/महिला: ४१/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०४ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://wcr.indianrailways.gov.in/



## होमगार्ड भरती २०२४

■ जागा : ९०००
पदाचे नाव :
१ होमगार्ड
■ जिल्हानिहाय रिक्त पदे:

| अ.क्र. | जिल्हा | पद संख्या |
|---|---|---|
| १ | सातारा | ४९५ |
| २ | नांदेड | ३२५ |
| ३ | रत्नागिरी | ४५८ |
| ४ | जळगाव | ३२५ |
| ५ | चंद्रपूर | ८२ |
| ६ | यवतमाळ | १२१ |
| ७ | सिंधुदुर्ग | १७७ |
| ८ | धुळे | १३८ |
| ९ | हिंगोली | ७५ |
| १० | अमरावती | १४१ |
| ११ | बीड | २३४ |
| १२ | धाराशिव | २३७ |
| १३ | वाशिम | ५९ |
| १४ | भंडारा | ३१ |
| १५ | नंदुरबार | ७९ |
| १६ | गडचिरोली | १४१ |
| १७ | रायगड | ३१३ |
| १८ | लातूर | १४३ |
| १९ | पुणे | १८०० |
| २० | सांगली | ६३२ |
| २१ | नाशिक | १३० |
| २२ | कोल्हापूर | २८७ |
| २३ | वर्धा | ७६ |
| २४ | छ. संभाजीनगर | ४६६ |
| २५ | नागपूर | ८९२ |
| २६ | जालना | १९५ |
| २७ | अकोला | १५१ |
| २८ | अहमदनगर | ३५९ |
| २९ | बुलढाणा | २४८ |
| ३० | बृहन्मुंबई | – |

■ शैक्षणिक पात्रता: किमान १०वी उत्तीर्ण
■ शारीरिक पात्रता:
उंची छाती धावणे
पुरुष १६२ से.मी. ७६ सेमी व फुगवून ५ सेमी जास्त १६०० मीटर
महिला १५० से.मी. – ८०० मीटर
■ वयाची अट: २० ते ५० वर्षे.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ महत्त्वाच्या तारखा:

| अ. क्र. | जिल्हा | Online अर्ज करण्याची शेवटची तारीख |
|---|---|---|
| १ | सातारा | ३१ जुलै २०२४ |
| २ | नांदेड | १४ ऑगस्ट २०२४ |
| ३ | रत्नागिरी | १४ ऑगस्ट २०२४ |
| ४ | जळगाव | १४ ऑगस्ट २०२४ |
| ५ | चंद्रपूर | १० ऑगस्ट २०२४ |
| ६ | यवतमाळ | १७ ऑगस्ट २०२४ |
| ७ | सिंधुदुर्ग | १४ ऑगस्ट २०२४ |
| ८ | धुळे | १४ ऑगस्ट २०२४ |
| ९ | हिंगोली | १४ ऑगस्ट २०२४ |
| १० | अमरावती | ०५ ऑगस्ट २०२४ |
| ११ | बीड | १६ ऑगस्ट २०२४ |
| १२ | धाराशिव | १४ ऑगस्ट २०२४ |
| १३ | वाशिम | १४ ऑगस्ट २०२४ |
| १४ | भंडारा | १६ ऑगस्ट २०२४ |
| १५ | नंदुरबार | १४ ऑगस्ट २०२४ |
| १६ | गडचिरोली | १४ ऑगस्ट २०२४ |
| १७ | रायगड | १६ ऑगस्ट २०२४ |
| १८ | लातूर | १६ ऑगस्ट २०२४ |
| १९ | पुणे | ११ ऑगस्ट २०२४ |
| २० | सांगली | १४ ऑगस्ट २०२४ |
| २१ | नाशिक | १४ ऑगस्ट २०२४ |
| २२ | कोल्हापूर | १४ ऑगस्ट २०२४ |
| २३ | वर्धा | १५ ऑगस्ट २०२४ |
| २४ | छ. संभाजीनगर | १४ ऑगस्ट २०२४ |
| २५ | नागपूर | २४ ऑगस्ट २०२४ |
| २६ | जालना | १७ ऑगस्ट २०२४ |
| २७ | अकोला | १७ ऑगस्ट २०२४ |
| २८ | अहमदनगर | १७ ऑगस्ट २०२४ |
| २९ | बुलढाणा | १७ ऑगस्ट २०२४ |
| ३० | बृहन्मुंबई | १४ ऑगस्ट २०२४ |

■ अधिकृत वेबसाईट https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php




## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४
■ जागा : २८९
■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: १०००/– मागासवर्गीय: ९००/–
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://dtp.maharashtra.gov.in/

## भारतीय रेल्वे

### भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१
■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिंटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह B.Sc (Physics/Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 500/- SC/ST/ExSM²/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: २५०/–
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर
■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/

# असे रस शोषककीडी व गुलाबी बोंड अळीचे करा व्यवस्थापन

कापूस पिकावर सुरवातीच्या काळात प्रामुख्याने मावा, तुडतुडे आणि फुलकिडे या रसशोषक किडीचा प्रादूर्भाव आढळून येतो. कोरडवाहू कापूस पिकावर मावा या किडीचा प्रादूर्भाव जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून आढळून येतो तर तूडतुड्यांचा प्रादूर्भाव जुलैच्या शेवटच्या आठवड्यापासून व फुलकीड्यांचा ऑगस्टच्या पहिला आठवड्यापासून आढळून येतो. तर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव डोमकळ्याच्या स्वरूपात ऑगस्ट महिन्यात दिसुन येतो. वरील सर्व प्रकारच्या किडीमुळे कपाशी पिकाचे नुकसान होऊ शकते. सुरुवातीपासुनच या किडींचे व्यवस्थापन केल्यास हे नुकसान बऱ्याच प्रमाणात कमी करता येते. त्यासाठी खालील उपाययोजनाचा अवलंब करावा.
एकात्मिक व्यवस्थापन:
■ रस शोषक कीडींचे व्यवस्थापन
■ बीटी कपाशीच्या बियाण्याला इमिडाक्लोप्रीड किंवा थायमिथोक्झाम किटकनाशकांची बीजप्रक्रीया केलेली असते. त्यामुळे रस शोषक किडींपासून सर्वसाधारण २ ते ३ आठवड्यापर्यंत पिकाला संरक्षण मिळते म्हणून या काळात किटकनाशकांची फवारणी करू नये.
■ वेळोवेळी प्रादूर्भावग्रस्त फांद्या, पाने व इतर पालापाचोळा जमा करून किडींसहीत नष्ट करावा.
■ पिकामधे उगवणीनंतर आठ ते दहा दिवसानंतर २५ पिवळे चिकट सापळे प्रती हेक्टर लावून नियमित पांढरी माशीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवावे.
■ कपाशीत चवळीचे आंतर पीक घ्यावे त्यामुळे चवळी पीकावर कपाशीवरील किडींच्या नैसर्गिक शत्रू किटकांचे पोषण होईल.
■ वेळेवर आंतरमशागत करून पीक तणविरहीत ठेवावे त्यामुळे किडींच्या पर्यायी खाद्य तणांचा नाश होईल. तसेच बांधावरील किडींच्या पर्यायी खाद्य तणे जसे अंबाडी, रानभेंडी इ. नष्ट करावी.
■ मृद परीक्षणाच्या आधारावर खतमात्रेचा अवलंब करावा आणि जास्तीचा नत्र खताचा वापर टाळावा जेणेकरून कपाशीची अनावश्यक कायीक वाढ होणार नाही आणि पीक दाटणार नाही पर्यायाने अशा पीकावर किडही कमी प्रमाणात राहील.
■ रस शोषक किडीवर उपजीविका करणारे नैसर्गिक किटक उदा. सीरफीड माशी, कातीन, ढालकिडे, क्रायसोपा इत्यादी परोपजीवी किटकांची संख्या पूरेशी आढळून आल्यास रासायनिक किटकनाशकांचा वापर टाळावा.
■ रस शोषक किडींसाठी कपाशी पिकाचे प्रादूर्भावाबाबत सर्वेक्षण करावे.
■ सरासरी संख्या १० मावा/पान किंवा २ ते ३ तूडतूडे/पान किंवा दहा फूलकीडे/पान किंवा मावा, तुडतुडे आणि फुलकिडे यांची एकत्रित सरासरी संख्या दहा/पान किंवा त्यापेक्षा जास्त आढळून आल्यास नियंत्रणासाठी रासायनिक किटकनाशकाचा वापर करावा. त्यासाठी बुप्रोफेझीन २५ टक्के प्रवाही २० मि.ली., किंवा फिप्रोनील ५ टक्के प्रवाही ३० मि.ली., किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के २.५ मि.ली. यापैकी कोणत्याही एका किटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**गुलाबी बोंड अळीचे व्यवस्थापन**

■ पिक उगवणीनंतर ४० ते ४५ दिवसांनतर फेरोमेन (कामगंध) सापळ्यांचा वापर करावा. सापळे पिकापेक्षा किमान एक फुट उंचीवर लावावेत, जेणेकरून फेरोमेन (कामगंध) सापळ्यांचा प्रभाव वातावरणात पसरण्यास मदत होईल. यासाठी एकरी दोन किंवा हेक्टरी पाच फेरोमेन (कामगंध) सापळे लावावेत. सतत तीन दिवस या सापळ्यामधे आठ ते दहा पतंग आढळल्यास गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनाचे उपाय योजावेत तसेच मास ट्रॅपिंग करीता हेक्टरी १५ ते २० कामगंध सापळे लावावेत.
■ प्रत्येक कापूस संकलन केंद्रावर व जीनींग फॅक्टरीमध्ये १५ ते २० कामगंध सापळे लावून दर आठवड्याने पतंगाचा नायनाट करावा.
■ पिकातील डोमकळ्या नियमित शोधून त्या अळी सहीत नष्ट कराव्या म्हणजे पुढील पिढ्यांची रोकथाम करता येईल
पिक उगवणी नंतर ३५ ते ४० दिवसांपासुन दर पंधरा दिवसांनी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा ॲझॅडिरेक्टिन ३००० पीपीएम ४० मिली प्रति १० ली पाणी या प्रमाणे फवारणी.
पिक उगवणी नंतर ५५ ते ६० दिवसांनी १२ ते १५ दिवसांच्या अंतराने ट्रायकोग्रामा टॉयडीयाबॅक्ट्री किंवा ट्रायकोग्रामा चिलोनिस परोपजीवी मित्र किटकांची कार्ड (१.५ लक्ष अंडी प्रति हेक्टरी) चार वेळा पिकावर लावावेत.
गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक आठवड्याला एकरी शेताचे प्रतिनिधित्व करतील अशी २० झाडे निवडून निवडलेल्या प्रत्येक झाडावरील फुले, पात्या व बोंडे संख्या मोजून त्यात गुलाबी बोंड अळीग्रस्त फुले, पात्या व बोंडे यांची टक्केवारी काढावी व प्रादुर्भावग्रस्ताची टक्केवारी ५ टक्के पेक्षा जास्त आढळल्यास खाली दिल्याप्रमाणे रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावी.
प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही ३० मिली किंवा क्लोरॅट्रानिलीप्रोल १८.५ टक्के एससी ३ मिली किंवा थायोडिकार्ब ७५ टक्के भुकटी २० ग्रॅम किंवा फिप्रोनील ५ टक्के एससी ३० मिली किंवा लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ईसी १२ मिली या पैकी कोणत्याही एका किटकनाशकची प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

(माहिती संकलन : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला)

# 'घरो घरी तिरंगा' उपक्रमांतर्गत महापालिकेच्यावतीने तिरंगा मॅरेथॉन

## घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन

पनवेल : माननीय आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक ११ऑगस्ट रोजी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने 'घरोघरी तिरंगा' या उपक्रमांतर्गत तिरंगा सन्मानार्थ 'तिरंगा मॅरेथॉन' आज काढण्यात आली. 'भारत माता की जय', वंदे मातरमच्या घोषणा देत महापालिका मुख्यालय ते वडाळे तलाव पर्यंत या तिरंगा मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले.
केंद्र शासनाच्या 'घरोघरी तिरंगा' उपक्रम अंतर्गत आज रविवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या नेतृत्वाखाली 'तिरंगा मॅराथॉन' आयोजित करण्यात आली. यामध्ये सुमारे ४०० हून अधिक विद्यार्थी, नागरिक, महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा विभाग आणि स्वच्छतादूत यांनी सहभाग घेतला.पनवेल महानगरपालिका कार्यालय- जय भारत नाका-स्वातंत्र्यवीर सावरकर चौक- बल्लाळेश्वर मंदिर- के. वि. कन्या शाळा- या मार्गे जाऊन शेवटी वडाळे तलाव येथे मॅराथॉनची सांगता झाली .



भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७७ वा वर्धापन दिन निमित्ताने शासन निर्देशानूसार ०९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये महापालिका कार्यक्षेत्रात 'घरोघरी तिरंगा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत १२ ते १४ ऑगस्ट रोजी बचतगटामार्फत 'तिरंगा मेला 'चे आयोजन करण्यात येणार आहे. दिनांक १३ ऑगस्ट रोजी 'देवकी मीडिया प्रस्तुत ऐ वतन तेरे लिये या देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १४ ऑगस्ट रोजी तिरंगा सन्मानार्थ बाइक व सायकल तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे.
याबरोबरच महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट असे तीन दिवस घरोघरी तिरंगा फडकवावा. त्यासोबतचे स्वत:चे सेल्फी काढून www.harghartiranga.com या संकेतस्थळावर अपलोड करावे असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.
पनवेल महानगरपालिकेच्यावतीने महापालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या 'घरोघरी तिरंगा ' या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.

'हर घर तिरंगा म्हणजेच घरोघरी तिरंगा' या अभियाना अंतर्गत

# कल्याण-डोंबिवली पालिकेतर्फे अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन

कल्याण : शासनाच्या निर्देशानुसार हर घर तिरंगा म्हणजेच घरोघरी तिरंगा या अभियानाची अंमलबजावणी महापालिका परिक्षेत्रात सर्वत्र करण्याबाबत आदेश महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी दिले आहेत. त्याअनुषंगाने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, नोडल अधिकारी धैर्यशील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेमार्फत अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.




यामध्ये दि. ०९ ऑगस्ट २०२४ रोजी ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून महापालिका क्षेत्रातील सैन्य, नौदल व वायुदलातील माजी ज्येष्ठ अधिकाऱ्यांचा तसेच अग्निशमन दलातील कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या कर्मचाऱ्यांच्या आप्तेष्टांचा महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांचे हस्ते सन्मान करण्यात आला.
महापालिका परिक्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना तसेच पालकांना महापालिकेच्या सहा.आयुक्त व अधिक्षकांमार्फत ध्वज वितरण करण्यात आले. महापालिकेच्या तसेच खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांमार्फत तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली. महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत उद्या दि. १३ ऑगस्ट २०२४ रोजी हर घर तिरंगा म्हणजेच घरोघरी तिरंगा या विषयाबाबत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि. १४ ऑगस्ट २०२४ रोजी शाळा-शाळांतून रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४ चे आयोजन

ठाणे : दि.०७ सप्टेंबर २०२४ पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या शासन स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे.
शासनाने निश्चित केलेल्या निकषाच्या आधारे पुरस्कारासाठी निवड करण्यात येणार आहे. शासनाने ठरविलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या किंवा करु शकणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीच स्पर्धेसाठी अर्ज करावयाचा असून अर्जाचा नमुना, गुणांकनाचे निकष, आवश्यक कागदपत्रे, फोटो व व्हिडीओबाबत तपशील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.३१ जुलै २०२४ च्या शासन निर्णयामध्ये दिला आहे. (हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)
सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेसाठीचे परिपूर्ण अर्ज प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई यांच्या mahotsav.pidagmail.com या ई-मेलवर दि.३१ ऑगस्ट २०२४ पूर्वी ऑनलाईन सादर करावयाचे आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून प्राप्त झालेले जिल्हानिहाय अर्ज प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास दि.०५ सप्टेंबर २०२४ पूर्वी उपलब्ध करुन देतील.

# 'घरोघरी तिरंगा अभियाना'सह विविध नागरी सेवासुविधांचा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी घेतला आढावा

नवी मुंबई : ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत संपूर्ण देशभरात 'घरोघरी तिरंगा' अर्थात 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनेही या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे आयोजन नेटकेपणाने सुनियोजित रितीने करावे व त्यामध्ये व्यापक लोकसहभागावर भर द्यावा असे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सर्व विभागप्रमुखांना दिले.
'घरोघरी तिरंगा' अभियान अंतर्गत नागरिकांनी १३ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत आपले घर, कार्यालय, आस्थापना यावर तिरंगा ध्वज फडकवावा व आपले राष्ट्रप्रेम व्यक्त करावे असे जाहीर आवाहन आयुक्तांच्या वतीने करण्यात आले असून त्यासाठी नागरिकांना तिरंगा राष्ट्रध्वज सहजपणे उपलब्ध होण्याकरीता नवी मुंबई महानगरपालिकेच्या आठही विभाग कार्यालयात सवलतीच्या दरात केवळ रु.१०/– इतक्या रक्कमेमध्ये तिरंगा राष्ट्रध्वज उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे विभाग कार्यालय स्तरावरही १२ व १३ ऑगस्ट रोजी स्थानिक नागरिकांच्या सहभागातून 'तिरंगा यात्रा' काढण्यात येत आहे.
त्याचप्रमाणे दि.१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी सकाळी ८.३० वाजता महापालिका मुख्यालयामध्ये ध्वजारोहण झाल्यानंतर सकाळी १० वाजता देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून त्यामध्ये स्वच्छतेचाही जागर करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे 'तिरंगा ट्रिब्युट' देत शहीद जवानांच्या कुटूंबियांचा सन्मानही करण्यात येणार आहे.



नागरिकांना 'प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव' साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले असून त्या अनुषंगाने बाजारात प्रतिबंधात्मक प्लास्टिक दिसणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी तसेच मखरामध्ये थर्माकोलचा वापर केला जाणार नाही व सजावटीत प्लास्टिक तोरणे, माळा यांचाही उपयोग नागरिकांनी करु नये याबाबत काटेकोर दक्षता घेण्याच्या व तसा संदेश नागरिकांमध्ये प्रसारित करण्याच्या सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.
या आढावा बैठकीप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार आणि इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

## सीबीडी पोलीस ठाण्याच्या आवारातील बेवारस वाहनांचा लिलाव

नवी मुंबई : सीबीडी पोलीस ठाण्याच्या आवारातील बेवारस पडून असलेल्या ०१ कार, ०४ मोटारसायकल अशा एकूण ०५ बेवारस वाहनांचा दि. १६ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती सीबीडी पोलीस ठाणे नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी दिली आहे. सीबीडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध कारणास्तव प्राप्त झालेली ०१ कार, ०४ मोटारसायकल अशी एकूण ०५ बेवारस वाहने सीबीडी पोलीस ठाण्याच्या आवारात एकत्र करून ठेवण्यात आली आहेत. या वाहनांच्या मूळ मालकांचा अथवा ताबा धारकांचा सर्वत्र तपास करण्यात आला असून, या बेवारस वाहनांसाठी कोणीही मालकी हक्क दाखविलेला नाही. त्यामुळे या वाहनांचा लिलाव करण्याकरिता उपप्रादेशिक विभागाकडून वाहनांचे मूल्यांकन करण्यात आले आहे. या ०५ वाहनांची तपशीलवार माहिती सीबीडी पोलीस ठाण्यात उपलब्ध आहे.

या लिलावात जास्तीत जास्त स्क्रॅप खरेदी विक्री करणाऱ्या शासनमान्य व्यवसायिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन सीबीडी पोलीस ठाणे नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# मिरा भाईंदरचे कोर्ट याच वर्षात सुरु होणार!

**आमदार प्रताप सरनाईक यांच्या लक्षवेधी सूचनेवर सरकारचे उत्तर**

भाईंदर : मिरा भाईंदर येथील नवीन न्यायालय इमारतीचे काम गेल्यावर्षीच पूर्ण झाले असून हे कोर्ट सुरु होण्याची प्रतीक्षा येथील नागरिक करीत आहेत. मिरा-भाईंदर येथे तयार असलेल्या या इमारतीत न्यायालय स्थापनेच्या व कोर्टातील अधिकारी - कर्मचारी वर्गाची नियुक्ती करून हे कोर्ट सुरु करण्याची कार्यवाही करावी यासाठी आमदार प्रताप सरनाईक यांचा पाठपुरावा सुरु आहे. त्यावर अधिकारी - कर्मचारी नेमणुकीची प्रक्रिया सुरु असून ती लवकरच पूर्ण केली जाईल व याच वर्षाच्या अखेरपर्यंत मिरा भाईंदर चे कोर्ट सुरु करण्याचे आश्वासन विधी व न्याय विभागाने आमदार सरनाईक यांना दिले आहे.

**मिरा भाईंदरकर नागरिकांना कोर्ट सुरु होण्याची गेले ३-४ वर्षे प्रतीक्षा असून लवकरात लवकर सर्व प्रक्रिया पूर्ण करून कोर्ट सुरु व्हावे इतकीच इथले वकील, नागरिक यांची अपेक्षा आहे.**
**-आ. प्रताप सरनाईक**

आमदार प्रताप सरनाईक यांनी अनेक वर्षे सतत पाठपुरावा करून मिरा भाईंदर शहरात न्यायालय इमारतीचे काम मंजूर करून घेतले होते. त्यात वेळोवेळी वाढीव निधी राज्य सरकारकडून मंजूर करून आणला, वेळोवेळी कामाची पाहणी करून या कामाला गती दिली. गेल्यावर्षी नोव्हेंबर महिन्यात न्यायालय इमारतीचे काम पूर्ण झाले होते. आमदार प्रताप सरनाईक यांनी पाहणी केल्यावर मिरा भाईंदर महापालिकेच्या नगर रचना विभागाने कोर्ट इमारतीला ओसी जारी केली होती व सार्वजनिक बांधकाम विभागाने कोर्ट इमारत न्याय विभागाला हस्तांतर करण्याची प्रक्रियाही लगेच सुरू केली होती. विधी व न्याय विभागाने मिरा भाईंदर न्यायालय इमारतीत आवश्यक कर्मचारी वर्ग व न्यायाधीश यांची नेमणूक करून कोर्ट सुरू करण्याची प्रक्रिया सुरू करण्याबाबत आमदार सरनाईक यांनी पाठपुरावा सुरु केला होता.

### विधी व न्याय विभागाचे उत्तर

ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर येथे दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारत (स्टिल्ट ३ मजले) बांधण्यासाठी शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या कोर्ट इमारतीचे काम पूर्ण झाले आहे व मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून दि.७ नोव्हेंबर २०२३ रोजी भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी.) प्राप्त झाले आहे. सदर इमारत हस्तांतरणाची प्रक्रिया ठाणे जिल्हा न्यायालयाकडून प्रगती पथावर आहे. मिरा-भाईंदर येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग हे न्यायालय स्थापन करण्यास व त्यासाठी आवश्यक ती पदनिर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या दि.२०/११/२०२३ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला असून, सदर प्रस्ताव उपमुख्यमंत्री (विधि व न्याय) यांच्या निदर्शनास आणण्यात आला होता. त्यानंतर सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही विभागामार्फत सुरु असताना मधल्या काळात यासाठी वेळ लागला आहे. वित्त विभागाचे विविध अभिप्रायांच्या अनुषंगाने ६ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या पदांमधून नवीन न्यायालयांसाठी पदांची व्यवस्था कशी करावी, याबाबत मार्गदर्शन तसेच प्रस्ताव देण्याची विनंती ६ मार्च २०२४ च्या पत्रान्वये उच्च न्यायालयास केली असून दि.मे व जून महिन्यात स्मरणपत्रे पाठविली आहेत त्याअनुषंगाने ही बाब उच्च न्यायालयाच्या न्यायालय स्थापना समितीसमोर ठेवण्यात आली असून त्यावर कार्यवाही सुरु आहे, समितीचे अभिप्राय शासनास कळविण्यात येतील असे उच्च न्यायालयाच्या दि. २८ जून २०२४ च्या पत्रान्वये विभागास कळविण्यात आले आहे. सबब, पदांच्या व्यवस्थेबाबत उच्च न्यायालयाच्या न्यायालय स्थापना समितीचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर मिरा-भाईंदर येथे न्यायालय स्थापनेच्या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे उत्तर अधिकाऱ्यांनी आमदार प्रताप सरनाईक यांना दिले आहे.



उद्धव साहेबांच्या आदेशानुसार भगव्या सप्ताहनिमित्त नवीन सभासद नोंदणी अंतर्गत राबोडी शिवसेना शाखेत सुलतान शेख यांनी सदस्य नोंदणी अर्ज भरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ठाणे शहर समन्वयक संजय तरे यांच्याकडे सुपूर्द केला त्याप्रसंगी खालील पदाधिकारी सहभागी झाले होते ठाणे शहर समन्वयक संजय तरे, माजी नगरसेविका विद्या कदम, विभाग प्रमुख वैशाली मोरे, विभाग प्रमुख मयूर पैलकर, विभाग समन्वयक योगेश भोईर, शाखाप्रमुख किशोर सुर्वे, संतोष दंत, उपविभाग प्रमुख सत्यवान कदम, रितेश कदम, अमित सावंत, सूर्यकांत लाड, मनोज पाटील, संदीप पारकर, भानुमती पाटील, मनोहर निकम, शिंदेकाका, सूर्यकांत वैती आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अर्ज केलेल्या महिलांनी आपले बँक खाते आधारकार्डशी संलग्न करावे**

## तात्काळ आशासेविका/अंगणवाडी सेविका/ ग्रामसेवकाशी संपर्क साधावा

### जिल्हा प्रशासनाचे महिलांना आवाहन

ठाणे : मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेसाठी ठाणे जिल्ह्यातून एकूण ५ लाख ३ हजार ८० अर्ज पात्र ठरले असून ३७ हजार अर्ज त्रुटीयुक्त आहेत. मात्र अद्याप ज्या महिलांचे बँक खाते आधार कार्डशी संलग्न केलेले नाही, अशा महिलांनी संबंधित बँकेत जावून बँक खाते आधार कार्डशी संलग्न करण्याची कार्यवाही करून घ्यावी, तसेच त्रुटी असलेल्या अर्जांच्या बाबतीत संबंधित महिलांनी तात्काळ आशा सेविका/ अंगणवाडी सेविका/ ग्रामसेवक किंवा ज्यांच्याकडून अर्ज भरुन घेतला असेल त्यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड व जिल्हा परिषद उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) संजय बागूल यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या आधार संलग्न बँक खात्यात दरमहा एक हजार पाचशे रुपये रक्कम जमा केली जाणार आहे. यासाठी संबंधित महिलेचे बँक खाते आधार संलग्न (आधार सीडिंग) केलेले असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करताना अर्जामध्ये नमूद आधार क्रमांकाला संलग्न केलेल्या बँक खात्यात लाभाची रक्कम थेट (डीबीटीद्वारे) जमा केली जाणार आहे. त्यामुळे महिलांनी आपले बँक खाते आधार संलग्न करून घेणे आवश्यक आहे. तसेच बँक खात्याची ई-केवायसी करणेही आवश्यक आहे. ई-केवायसी करण्याची कार्यवाही नजीकच्या सेतू केंद्रावर करता येईल. मात्र, बँक खाते आधार संलग्न करण्याची कार्यवाही संबंधित बँकेत जावून करणे आवश्यक आहे.

बँक खाते आधार संलग्न करण्याबाबत जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आणि संबंधित बँकांना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत. योजनेसाठी अर्ज सादर करताना काही महिलांनी आपले खाते आधार संलग्न नसल्याचे नमूद केले आहे. अशा महिलांनी आपले बँक खाते आधार संलग्न करण्याची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी,त्याचबरोबर जिल्हा प्रशासनाने त्रुटीयुक्त प्रकरणांनाही न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न सुरू केला आहे. यासाठी त्रुटी असलेल्या संबंधित महिलेने आपल्या नजीकच्या आशा सेविका/ अंगणवाडी सेविका/ग्रामसेवक किंवा ज्यांच्याकडून अर्ज भरुन घेतला असेल त्यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा व आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता करून आपला अर्ज मंजूर करून घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## भारतीय स्वातंत्र्यदिन कोकण भवन येथे साजरा होणार

नवी मुंबई :स्वातंत्र्यदिनाच्या वर्धापन दिनोत्सवानिमित्त कोकण विभागीय स्तरावरील ध्वजारोहण सीबीडी बेलापूर, नवीमुंबई येथील कोंकण भवन इमारतीच्या प्रांगणात गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ठीक ०९.०५ वाजता कोकण विभागीय महसूल आयुक्त पी.वेलरासू (भा.प्र.से) यांच्या हस्ते होणार आहे. या राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने राष्ट्रीय अथवा समारंभीय पोषाखात उपस्थित रहावे, समारंभ सुरु होण्याच्या २० मिनिटे अगोदर कार्यक्रमस्थळी उपस्थित रहावे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया कोणतीही बॅग सोबत आणू नये, असे आवाहन कोकण विभागीय महसूल आयुक्त पी.वेलरासू यांनी केले आहे.

## कोकण विभागीय लोकशाही दिनी आज तीन अर्ज निकाली

नवी मुंबई : कोंकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये उप आयुक्त (सामान्य प्रशासन) श्री. अमोल यादव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली. यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या १६ असून आज आलेल्या अर्जांची संख्या निरंक आहे, असे एकूण प्राप्त अर्ज १६ होते त्यापैकी ०३ अर्ज निकाली काढण्यात आले असून १३ अर्ज प्रलंबित आहेत.

# स्पर्धा परीक्षा हे अग्निपथ आहे : प्रताप दिघावकर

ठाणे : मुलाखतीत उमेदवाराचे ज्ञान अजिबात तपासले जात नाही, तर आत्मविश्वास पाहिला जातो. युपीएससी, एमपीएससी हे सर्व्हीस सिलेक्शन नव्हे तर ते सर्व्हिस रिजेक्शन बोर्ड आहे. एमपीसएसी, युपीएससीच्या तयारी करताना प्लॅन बी तयार पाहिजे. स्पर्धा परिक्षा हे अग्निपथ आहे, असा मोलाचा सल्ला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य व माजी विशेष पोलीस महानिरीक्षक प्रताप दिघावकर यांनी स्पर्धा परिक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना रविवारी ठाण्यात दिला.




रिलायबल अर्कडमीच्यावतीने रविवारी गडकरी रंगायतन येथे स्पर्धा परीक्षा संमेलनाचे आयोजन केले होते. युपीएससी आणि एमपीएससीमध्ये १९३७ पासून जितके बदल झाले नाही तितके मी आणि आमच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांनी दोन वर्षांत केले. या बदलत्या निर्णयांमुळे २०२६-२०२७ मध्ये महाराष्ट्रातील २५० मुले युपीएससीमध्ये निवडले जातील ही खात्री आहे. हे सांगताना दिघावकर पुढे म्हणाले की, चांगला माणूस हा चांगला अधिकारी होऊ शकतो. आज एक दोन ठिकाणी छापे टाकले की अधिकारी ताबडतोब सिंघम होतात. पण तुमचे माणूस म्हणून काय योगदान हे महत्त्वाचे आहे.

राज्य राखीव पोलीस बल, नवी मुंबईच्या समादेशक मोक्षदा पाटील म्हणाल्या की, स्पर्धा परिक्षेची तयारी करताना मानसीक आरोग्य देखील महत्त्वाचे आहे. स्पर्धा परिक्षेची तयारी करताना प्लॅन बी देखील तयार ठेवा. हातचं सुटलं अशी परिस्थिती व्हायला नको.

केंद्रीय लोकसेवा आयोगचे माजी अध्यक्ष डीपी अग्रवाल यांनी भारतातील नागरी सेवा परीक्षा व त्यात झालेले काळानुरूप बदल याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला पत्रकार सौरभ द्विवेदी, रिलायबल अर्कडमीचे संचालक मनोहर पाटील आदी उपस्थित होते. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांचा रिलायबल अर्कडमीच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गेल्या सात वर्षांपासून रिलायबल अर्कडमीच्या माध्यमातून हे स्पर्धा परीक्षांचे संमेलन आयोजित करण्यात येते. याठिकाणी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारी पुस्तके ५० टक्के सवलतीच्या दरात उपलब्ध केली जातात. हा एक प्रकारे मदतयज्ञ असून भविष्यात यापेक्षा मोठ्या पातळीवर संमेलन आयोजित करण्याचा रिलायबल अर्कडमीचा मानस असल्याचे संचालक मनोहर पाटील यांनी सांगितले.

## पालिकेच्यावतीने हुत्तात्मा स्मारकाला अभिवादन, 'हर घर तिरंगा' उपक्रमाला सुरुवात

भिवंडी : ९ आगस्ट क्रांतीदिनानिमित्ताने शहरातील आय.जी.एम हॅस्पीटलच्या रस्त्यावर असलेल्या हुतात्मा स्मारकास पालिका अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके यांनी पुष्पचक्र वाहून अभिवादन केले. यावेळेला उपायुक्त मुख्यालय नयना ससाणे, शिक्षण विभाग उपायुक्त डॉ. अनुराधा बाबर, पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता संदीप पटनावर, प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त अजित महाडिक, आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त फैसल तातली, प्राथमिक शिक्षण विभाग प्रशासनाधिकारी बाळाराम जाधव, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले , परवाना विभाग प्रमुख प्रकाश राठोड, क्रीडा अधिकारी शरद




कलावंत, सहायक आयुक्त नितिन पाटील, प्रकाश पाटील, प्र.स.क्र. ४ चे सहायक आयुक्त सुनिल भोईर, उद्यान विभाग निलेश संखे, वैद्यकीय अधिकारी बुशरा सय्यद, शिक्षणाधिकारी उमेश संबारी उपस्थित होते. सर्वांनी हुतात्मा स्मारकास पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

केंद्र शासनाच्या वतीने ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्याचा शुभारंभ देखील या वेळी करण्यात आला. पालिका अतिरिक्त आयुक्त यांनी सर्व उपस्थितांना भारताच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी स्वतः ला समर्पित करीन अशा आशयाची शपथ सर्वांना देण्यात आली, पालिका अतिरीक्त आयुक्त यांनी तिरंगा रॅलीला तिरंगा ध्वज दाखवून सुरुवात केली,त्यानंतर हुतात्मा स्मारक ते पालिका मुख्यालयापर्यंत तिरंगा रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये भारत माता की जय, वंदे मातरम या घोषणा देऊन हर घर तिरंगा या उपक्रमाची जनजागृती करण्यात आली. यामध्ये दांडेकर शाळेतील विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. याला पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके यांनी साहेब भिवंडीकरांना आवाहन केले की १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान आपल्या घरावर, दुकानावर, तिरंगा ध्वज फडकवून हा राष्ट्रीय उत्सव साजरा करावा.

## दिव्यात भगवा सप्ताह निमित्त सदस्य नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

दिवा : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रात भगवा सप्ताह कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता याचेच अवचित्त साधून दिवा विभागात दिवा स्टेशन परिसरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे दिवा शहराच्या वतीने स्टेशन परिसरात सदस्य नोंदणी अभियान आयोजित करण्यात आली होती या कार्यक्रमाला



लोकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे यात लोकांनी भरपूर प्रमाणात गर्दी करून आपलं सदस्य नोंदणी फॉर्म भरून घेतले सदर कार्यक्रमाची सुरुवात जिल्हाप्रमुख सदानंद थरवळ यांच्या हस्ते करण्यात आली यावेळी शहर प्रमुख सचिन पाटील शहर संघटक रोहिदास मुंडे शहर संघटिका ज्योती पाटील विधानसभा संघटिका योगिता नाईक युवा शहराधिकारी अभिषेक ठाकूर शहर समन्विका प्रियंका सावंत स्मिता जाधव विभाग प्रमुख हेमंत नाईक शनिदास पाटील नागेश पवार मच्छिंद्र लाड चेतन पाटील रवी रसाल उपविभाग प्रमुख अजित माने संदीप राऊत योगेश निकम शाखाप्रमुख उपशाखाप्रमुख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## तीन विद्यार्थी गंभीर जखमी

कल्याण : कल्याणजवळील पत्रीपूल येथे शुक्रवारी सकाळी भरधाव वेगात असलेल्या एका मोटार कार चालकाने दिलेल्या धडकेत नेतिवली भागातील तीन विद्यार्थी गंभीर जखमी झाले. मोटार कार चालकाने घटनास्थळावरून पळून न जाता तिन्ही विद्यार्थ्यांना पालिकेच्या डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी उपचार करून नंतर या विद्यार्थ्यांना घरी सोडण्यात आले. हे तिन्ही विद्यार्थी नेतिवली, पत्रीपूल भागातील रहिवासी आहेत. शुक्रवारी सकाळी ते पत्रीपूल येथून पायी मलंग रस्ता भागात असलेल्या आपल्या शाळेत पायी चालले होते. त्यावेळी हा अपघात झाला.

## उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकेची गोरेगाव येथे नवीन शाखा



ठाणे : उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडने (उत्कर्ष एसएफबीएल) आज मुंबईतील गोरेगाव (पश्चिम) येथे त्यांच्या नवीन शाखेच्या उद्घाटनाची घोषणा केली. या नवीन शाखेसह बँकेच्या महाराष्ट्रात ७६ शाखा झाल्या असून, देशभरातील शाखांची संख्या ९३१ झाली आहे. उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडच्या सद्यस्थितीत अंधेरी पूर्व, भाईंदर, बोरिवली (प), चेंबूर (पूर्व), दादर (प), घाटकोपर (पूर्व), कांदिवली (प.), खारघर, मालाड (प.), मिरा रोड, मुलुंड (प.), नेरूळ, पालघर, सांताक्रूझ (पू), ठाणे (जीबी रोड आणि नौपाडा) विलेपार्ले (पू), वडाळा, वसई, विरार, उल्हासनगर आदी ठिकाणी शाखा आहेत.

गोरेगाव येथील शाखेचे उद्घाटन उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचे संचालक नागेश दिनकर पिंगे यांच्या हस्ते करण्यात आले. 'बँकेने आपल्या प्रगतीचा मार्ग योग्य वाटेवर आणला आहे. गोरेगाव (प.) येथे या शाखेचे उद्घाटन बँकेच्या सर्वसमावेशक वित्तीय सेवा प्रदान करण्याच्या धोरणाची साक्ष आहे'. ही शाखा केवळ अत्याधुनिक बँकिंग अनुभवच देणार नसून, ग्राहक सेवेत उत्कृष्टता प्रदान करेल, असा विश्वासही पिंगे यांनी व्यक्त केला.

विस्तारावर भाष्य करताना उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक (एमडी) आणि विशेष कार्यकारी अधिकारी (सीईओ) गोविंद सिंग म्हणाले, की आर्थिक राजधानी मुंबईत आमचे बँकिंग जाळे वाढवताना आम्हाला आनंद होत आहे. राज्यात आमचा विस्तार वाढवण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. व्यावसायिक आणि निवासी विकासासाठी ओळखले जाणारे तसेच गजबजलेले उपनगर असलेले गोरेगाव व्यवसाय वाढीच्या उत्कृष्ट संधी उपलब्ध करून देते. या नवीन शाखेचे उद्घाटन स्थानिक नागरिकांना महत्त्वाच्या बँकिंग सेवांमध्ये सामावून घेण्यास मदत करेलच; पण आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी, आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी आणि स्थानिक लोकांचे सक्षमीकरण करण्यातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल'.



मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त संजय श्रीपतराव काटकर यांचे मार्गदर्शनानुसार व अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांचे सूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे बस ऑपरेटर मे. महालक्ष्मी सिटी बस ऑपरेटर ( एस पी व्ही) एल. एल. पी. यांचेमार्फत कार्यरत बस चालक/ प्रवर्तक यांचेसाठी घोडबंदर बस डेपो येथे आरोग्य तपासणी शिबिर आयोजीत करण्यात आले होते. सदरचे शिबिर रविवार दि. ०४.०८.२०२४ व दि. ११.०८.२०२४ या दिवशी Apex Hospital Management, Borivali. यांचे माध्यमातून मोफत घेण्यात आले. सदर शिबिरामध्ये दि. ०४.०८.२०२४ रोजी १०६ व दि. ११.०८.२०२४ रोजी ८५ बस चालक व प्रवर्तक यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असुन यामध्ये रक्त तपासणी, डोळ्यांची तपासणी, रक्तदाब, ECG इ. तपासण्या करण्यात आल्या आहेत. सदर शिबिरामुळे कर्मचारी यांना आपल्या आरोग्याविषयी माहिती मिळणेस व वेळीच उपचार घेणे शक्य होणार आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१